N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** परतवाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0749 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/11/2025 23:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/08/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2025
**Time From (वेळेपासून):** 13:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 07/11/2025 **Time (वेळ):** 22:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 048
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2025 22:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वनपरीक्षेत्र अधिकारी प्रादेशीक,कार्यालय परतवाडा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** परतवाडा
**District(State) (जिल्हा(राज्य)):** अमरावती ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनि .निलिमा शालीग्राम सातव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8669000360

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभय भिमसेन चंदेल | | | 1. कांडली, परतवाडा ,ताअचलपुर जि अमरावती,परतवाडा, अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

फिर्यादि पोस्टेला हजर येताच लगेच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|





पोलीस स्टेशन परतवाडा जि. अमरावती (ग्रामीण)

पोलीस स्टेशन परतवाडा
जि. अमरावती (ग्रामीण)

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकिकत - फिर्यादि दि.07/11/2025 सरतर्फे:-श्रीमती.निलिमा शालीग्राम सातव, वय-38 वर्ष , व्यवसाय -नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,अमरावती. मो-8669000360. मी आज रोजी समक्ष ला. प्र.वि कार्यालय अमरावती येथे सरतर्फे फिर्याद देते की, मी वरील प्रमाणे ठिकाणी पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि.31/07/2025 रोजी मी ला.प्र.वि. अमरावती येथे कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.प्रदिप शामरावजी कराळे, वय 62 वर्ष, व्यवसाय-शेती/इलेक्टानिक शॉप, रा.सिव्हील लाईन, परतवाडा ता.अचलपुर जि. अमरावती यांनी तोंडी तक्रार सांगीतली की, तक्रारदार व त्यांचा मुलगा शिवा प्रदीप कराळे वय 29 वर्ष असे शेती/इलेक्ट्रानिक शॉप चालवितात. तक्रारदार यांचे घरातील व शेतीचे सर्व व्यवहार तेच पाहतात. तक्रारदार यांची मौजे म्हसोना ता.अचलपुर जि.अमरावती येथे सर्वे नं. 223 आठ ऐकर शेती असुन ती शेती तक्रारदार, त्यांची पत्नी व मुलगा यांच्या नावाने आहे. तक्रादार यांनी त्यांचे शेतात पंचवीस वर्षा आधी अंदाजे 125 सागवान झाडे लावली होती. त्यापैकी 50 झाडे कापण्यासाठी तक्रारदार यांनी दि.24/02/2025 रोजी मा.वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथे त्यांचा मुलगा नामे शिवा कराळे यांच्या नावाने अर्ज केला होता. त्यानंतर मा.वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा यांनी जाहीरनामा करून कायदेशिर कार्यवाही पुर्ण केली होती.
त्या अर्जावर तक्रारदार यांना दि. 09/05/2025 रोजी 50 सागवान झाडे तोडण्याची परवानगी मा.वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा यांच्या कडुन मिळाली होती. त्यानंतर काही दिवसातच त्यांनी 50 सागवानची झाडे तोडली. व त्यानंतर मा.वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचमाना केला. त्यानंतर दि.04/06/2025 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा यांच्या कार्यालयात रहदारी पास मिळणेबाबत तक्रारदार यांचा मुलगा शिवा कराळे यांचे नावाने त्यांनी अर्ज केला होता. त्यानंतर तक्रारदार यांनी सदर प्रकरणा बाबत वेळोवेळी वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथील कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. वाळके व वनपाल श्री.चंदेल यांना जावुन विचारपुस केली असता त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुमचे प्रकरण सहायक वनसंरक्षक, कार्यालय अमरावती येथे पाठविले आहे. त्यावरून तक्रारदार हे सहायक वनसंरक्षक, कार्यालय अमरावती येथे येवुन मा.सहायक वनसंरक्षक श्री.देसाई यांना बरेचदा भेटले परंतु त्यांनी सांगितले की, त्यांचेकडे हॅमर उपलब्ध नाही आहे. असे म्हणुन उडवा उडविचे उत्तर देत होते. त्यामुळे तक्रारदार परत वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथील कार्यालयातील वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके व वनपाल श्री.चंदेल यांना दि. 12/07/2025 रोजी भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, ''सहायक वनसंरक्षक अधिकारी यांचा हॅमर करून रहदारी पास देण्याचा एका घन मिटरचा 1000/- रू. रेट आहे. तुमचे 11 घन मिटर आहे तर तुम्हाला 11,000/- रुपये दयावे लागतील. तुम्ही आमच्या जवळ पैसे आणुन दया तरच तुम्हाला रहदारी पास मिळेल.'' तसेच तक्रारदार यांनी ही सरकारी फी आहे का? असे त्यांना विचारले असता वनपाल चंदेल यांनी म्हटले की, ''ही सरकारी फी नाही. तुम्ही 11,000/- रु. माझ्याकडे आणुन दया. मी सहायक वनसंरक्षक श्री.देसाई सराना फोन करून सांगेल की, 11,000/- रु. कराळे यांच्या कडुन मिळाले आहे. त्यानंतर श्री.देसाई साहेब येवुन हॅमर करून तुम्हाला रहदारी पास देतील.'' वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके व वनपाल श्री.चंदेल हे सहायक वनसंरक्षक अधिकारी श्री.देसाई साहेबाचे नाव सांगुन तक्रारदार यांना हॅमर व रहदारी पास देण्यासाठी 11,000/- रु. लाच मागत आहेत. तक्रारदार यांना लाच म्हणुन 11,000/-रु. देण्याची ईच्छा नाही तसेच त्यांच्यासोबत तक्रारदार यांचा कोणताही देवाण घेवाण चा आर्थीक व्यवहार नाही. तसेच त्यांच्यासोबत कोणत्याही प्रकारचा वाद नाही तरी त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार दिली. त्यावरून आम्ही तत्काळ मा.प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती यांना पत्र देवुन 1) श्री.प्रविण दिगंबर मुंगले, कनिष्ठ लिपीक 2) श्री.स्वप्नील मनदेवराव खडसे, कनिष्ठ लिपीक असे दोन सरकारी पंच बोलविले सदर दोन सरकारी पंचांना तक्रारदार त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हा व पंचासमक्ष वरीलप्रमाने हकीकत पुन्हा सांगीतली व कागदावर

पोलीस स्टेशन परतवाडा जि. अमरावती (ग्रामीण)

लिहुन तशी लेखी तक्रार आम्हास सादर केली. त्यावर पंच क्र.1 श्री.मुंगले यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन आम्ही सुध्दा सही केली. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे खरोखर लाचेची मागणी केली आहे काय ? याबाबत पडताळणी करणे असल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके व वनपाल श्री. चंदेल यांची भेट कधी व कोठे होवु शकते याबाबत तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की, उदया दिनांक 01/08/2025 रोजी कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके व वनपाल श्री.चंदेल यांची भेट होवु शकते. त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर दि.01/08/2025 रोजी सकाळी 10/30 वा. ला.प्र.वि. कार्यालय अमरावती येथुन पडताळणी कार्यवाही व सापळा पुर्व व सापळा कार्यवाही करिता शासकिय वाहन क्रमांक एम.एच.27 बिव्ही 1568 ने शासकिय पंच, सापळा पथक यांच्यासह कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा करिता पंचवटी, शेगाव नाका,कठोरा नाका मार्गे रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार यांचे परतवाडा येथे इलेक्ट्रनिक शॉप येथे अंदाजे 12/30 वा पोहोचलो. त्यानंतर पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकॉडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री.मुंगले यांचेसह वनपरिक्षेत्र अधिकारी . श्री.वाळके व वनपाल श्री.चंदेल यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये रवाना केले.त्यावेळी रवाना झाल्याची वेळ 13/03वा ची असुन 13/26वा ते परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके व वनपाल श्री.चंदेल यांच्यातील संभाषणाची क्लिप ऐकली असता त्यावेळेस वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके हे कार्यालयात हजर नव्हते परंतु वनपाल श्री.चंदेल हे कार्यालयामध्ये उपस्थित होते. त्यावेळी तक्रारदार व श्री.वनपाल श्री.चंदेल यांच्यात कामाबाबत बोलनी झाल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर वनपाल श्री.चंदेल यांनी तक्रारदार यांना म्हटले की," किती घन मिटर आहे आपल टोटल"त्यावर तक्रारदार बोलले की," अकरा साडे अकरा काही तरी आहे" त्यावर वनपाल श्री.चंदेल बोलले की," ठिक आहे ना... सहा पाच सहा हजार रुपये..."त्यावर तक्रारदार बोलले की," पाच सहा हजार ठिक आहे ना करुन टाकु ना काय आहे त... काय पण लेट होवून आल ना सगळ "त्यावर वनपाल श्री.चंदेल बोलले की," आपल्या कडून काही आहे का..."त्यावर तक्रारदार बोलले की," ह... किती दयाचे मग... किती.."त्यावर वनपाल श्री.चंदेल बोलले की " सहा... तुमच्या इकडून देवून टाका..." त्यानंतर "ठिक आहे ना" असे बोलुन तक्रारदार हे पंचासोबत तेथुन निघुन परत आले. तेव्हा पडताळणी कारवाई दरम्यान वनपाल श्री.चंदेल यांनी लाच रक्कम मागीतल्याचे निश्पन्न झाले. परंतु वनपाल श्री.चंदेल यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.वाळके यांचे काही नाही असे म्हटले. तसेच तक्रारदार यांनी सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई हे पैशाची मागणी करु शकतात असे सांगीतले. त्यामुळे सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांची पडताळणी करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा क्र.1 करण्यात आला. त्यानंतर आम्हाला तक्रारदार यांनी फोनदवारे दिलेल्या माहितीवरुन दि.12/08/2025 रोजी सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांची भेट होवू शकते असे सांगीतले. त्यावरुन दि.12/08/2025 रोजी पडताळणी कार्यवाही करीता आम्ही, दोन्ही पंच व संपुर्ण सापळा पथक सकाळी 11.00 वा. ला.प्र.वि.कार्यालय अमरावती येथे हजर आले. त्यानंतर पडताळणी कार्यवाही करणेकरीता तक्रारदार यांचे जवळ व्हाईस रेकॉडर सुरु करुन देवुन त्यांना पंच क्र.1 श्री.मुंगले यांचेसह सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांची भेट घेण्यासाठी उपवनसंरक्षक कार्यालय,अमरावती कार्यालयामध्ये रवाना केले. थोडयाच वेळात ते परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांच्यातील संभाशणाची क्लिप ऐकली असता सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांनी तक्रारदार यांना स्पश्ट शब्दात पैशासाठी नकार दिला असल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर तक्रारदार हे पंचासोबत तेथुन निघुन परत आले. तेव्हा पडताळणी कारवाई दरम्यान सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांनी लाचेची मागणी न केल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा क्र.2 करण्यात आला. त्यानंतर सदर प्रकरणामध्ये मार्गदर्शन मिळणेबाबत मा.पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांना दि.22/08/2025 रोजी पत्रव्यवहार करण्यात आला असता मा.पोलीस अधिक्षक सा. यांचे दि.28/10/2025 रोजीचे पत्रानुसार गैअर्जदार श्री.चंदेल वनपाल यांचेविरुध्द कलम 7, 7(A) भ्र.प्र.अ. 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबतचे मा.अपर महासंचालक, ला.प्र.वि.म.रा.मुंबई यांचे निर्देष प्राप्त झाले आहे. त्यानंतर याबाबत तक्रारदार श्री.प्रदिप कराळे यांना माहिती देण्यात आली. त्यादरम्यान आम्ही गैरअर्जदार श्री.चंदेल यांचा त्यांचे कार्यालय परीसर, त्यांचे घरी तसेच इतर ठिकाणी शोध घेतला असता ते मिळून आले नाही.

त्यानंतर दि.06/11/2025 रोजी तक्रारदार श्री.प्रदिप कराळे यांनी निवेदन दिले की, त्यांचे शेतातील वनपरीक्षेत्र अधिकारी परतवाडा यांच्या परवानगीने तोडलेल्या 50 सागवानच्या झाडांची हॅमर करुन रहदारी पास मिळून देण्याकरीता वनपाल श्री.चंदेल यांनी 6 हजार रुपयाची मागणी केली होती. तसेच सहायक उपवनसंरक्षक श्री.देसाई यांनी कोणतीही लाचेची मागणी केलेली नाही. तसेच वनपाल श्री.चंदेल यांना त्यांचेवर संषय आल्याने ते त्यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारणार नाही. त्यामुळे त्यांचे वर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. असे निवेदन

दिले. तरी, वनपरीक्षेत्र अधिकारी प्रादेशीक कार्यालय, परतवाडा येथील वनपाल श्री.अभय चंदेल यांनी दि. 01/08/2025 चे पडताडणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्री. प्रदिप कराळे यांचे शेतातील सागवानच्या झाडांची हॅमर करुन रहदारी पास मिळून देण्याकरीता तडजोडी अंती 6,000/-रू लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. परंतु वनपाल श्री.अभय चंदेल यांना तक्रारदार श्री.कराळे यांचेवर संशय आल्याने त्यांचेकडून पैसे स्विकारले नाही. तरी श्री.अभय भिमसेन चंदेल, वय 50 वर्शे, पद -वनपाल,वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशीक कार्यालय परतवाडा, रा. कांडली, परतवाडा यांचे विरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढून ती मी वाचुन पाहीली, माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SURESH RAMESHWAR MASKE(I (Inspector)) / DGPSRMM8106 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस स्टेशन परतवाडा सत्यमेव जयते जि. अमरावती (ग्रामीण)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SURESH RAMESHWA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSRMM8106

स्टेशन डायरी अमलदार
पोलीस स्टेशन परतवाडा
जि. अमरावती (ग्रामीण)